महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०५ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### थकीत मालमत्ता करांचं आव्हान!

मागील काही महिन्यांपासून अनेक शहरांमध्ये मालमत्ता कराची वसुली अपेक्षेपेक्षा कमी झाल्याचे दिसून आले आहे. मालमत्ता कर हा नगरपालिकांच्या विकासाचा आणि नागरिकांसाठी सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रमुख स्रोत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधा या करावर अवलंबून असतात.

सद्य परिस्थितीत मालमत्ता कराची वसुली अपेक्षेपेक्षा कमी होत असल्यामुळे शहरातील मूलभूत सुविधा सुरळीत चालवण्यावर गंभीर चिन्ता आहे. कर भरण्यात ढिलाईमुळे पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सेवा आणि स्वच्छता यासारख्या सेवांचा दर्जा बाधित होऊ शकतो, ज्याचा थेट परिणाम सर्व नागरिकांवर होतो. जर नागरिक आपले कर्तव्य निभावत न ठेवले, तर शहराचा विकास, प्रकल्पांची अंमलबजावणी आणि नागरी सुविधा यांचे नियोजन धोक्यात येऊ शकते, हे चिंतेचे कारण आहे.

कर भरण्यात उशीर किंवा नकार करणाऱ्या नागरिकांवर जप्ती, वॉरंट बजावणे, नळजोडणी खंडित करणे आणि इतर सेवा थांबवणे यांसारखी कारवाई करणे अत्यंत गरजेचे ठरते. ही उपाययोजना केवळ प्रशासनाचे अधिकार नाही तर नागरिकांसाठी सुचना देखील आहे की, वेळेत कर भरणे ही त्यांच्या हक्कासोबतच कर्तव्य आहे. शहरातील विकासाचे अनेक महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत आणि त्यांचा यशस्वी अंमलबजावणी फक्त योग्य नियोजनावर नाही तर नागरिकांच्या जबाबदारीवरही अवलंबून आहे. नागरिकांनी आपले कर्तव्य निभवल्यास शहर अधिक सुरक्षित, विकसित आणि सर्वांसाठी सुविधा संपन्न बनेल. शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि विकासासाठी नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरणे अत्यावश्यक आहे. कर्तव्य पाळल्यानेच शहरातील सेवा सुरळीत चालतील आणि प्रत्येक नागरिकासाठी सुविधा उपलब्ध राहतील.

# भातसा धरणातून सिंचनाचे पाणी बंद

## शहापूर-भिवंडीतील १०८ गावांतील शेतकरी चिंतेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**शहापूर :** शहापूर येथील भातसा धरणातील उजवा तीर कालवा वारंवार फुटून नादुरुस्त होत असल्याने सिंचनासाठी सोडले जाणारे पाणी तात्पुरते बंद करण्यात आले आहे. यामुळे शहापूर आणि भिवंडी तालुक्यातील सुमारे १०८ गावपाड्यांतील शेती पाण्याअभावी कोरडी पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या भागातील शेतकऱ्यांनी लावलेली दुबार भातशेती तसेच भाजीपाला लागवड पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असून शेतकरी चिंतेत आहेत. भातसा उजवा तीर कालवा ठिकठिकाणी भगदाड पडल्याने दररोज लाखो लिटर पाणी नासाडी होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी वाया जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. भातसा धरणाशी जोडलेल्या उजव्या तीर कालव्याची एकूण लांबी ६७ कि.मी. असून, त्यापैकी सुमारे ५४ कि.मी. भिवंडी तालुक्यातील सैतानी नदीपर्यंत कालव्याचे काम पूर्ण झाले आहे.

**१,६०० हेक्टर जमीन ओलिताखाली**

उर्वरित काम अद्याप अपूर्ण असून, सध्या कार्यरत असलेल्या या कालव्याद्वारे शहापूर व भिवंडी तालुक्यातील १०८ गावांतील जवळपास १,६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येते. दरवर्षी उन्हाळी हंगामात दुबार भातशेती व भाजीपाला लागवडीसाठी जलसंपदा विभागाकडून या कालव्यातून पाणी सोडले जाते. या पाण्यावर अनेक शेतकऱ्यांचा जोडधंदा अवलंबून आहे. मात्र, कालव्याच्या देखभाल-दुरुस्तीची कामे झाल्याचा दावा असूनही ठिकठिकाणी भगदाड पडल्यामुळे सिंचनासाठी सोडले जाणारे पाणी वाया जात आहे.



**■ शेतकरी हवालदिल**

यंदा दुरुस्ती कामे उशिरापर्यंत सुरू राहिल्याने १ जानेवारीपासूनच पाणी सोडण्यात आले, तर दरवर्षी साधारण १५ डिसेंबरपासून पाणीपुरवठा सुरू होतो. कालवा साखळी क्रमांक ३८ जवळ आवरे गाव परिसरात भराव खचल्याने पुन्हा दुरुस्ती करावी लागत आहे. वारंवार सिंचनाचे पाणी बंद केल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. गेल्या वर्षी लाखो रुपयांचा खर्च करून कालव्याच्या देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगितले होते; मात्र, एवढ्या खर्चानंतरही पुन्हा दुरुस्तीची वेळ येत असल्याने आधी झालेल्या कामांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाला आहे.

# केडीएमसीची रुग्णालये वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न होणार !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली पालिकेच्या कल्याणमधील बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, गौरीपाडा येथील रुग्णालय आणि पूर्वेतील कोळसेवाडी येथील शक्तिधाम अशी तीन रुग्णालये सात वर्षाच्या कालावधीसाठी अंबरनाथ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित करण्याचा निर्णय पालिका प्रशासन आणि महाविद्यालय प्रशासनाने सामंजस्य कराराद्वारे घेतला आहे. या संलग्नतेमुळे पालिका रुग्णालयांमध्ये मुबलक मनुष्यबळ उपलब्ध होऊन रुग्णांना तत्पर आणि दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळणे शक्य होणार आहे. नवीन वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी यामुळे प्रत्यक्ष रुग्णसेवेतील अनुभवही मिळवू शकतील. सदर विषय नगरसेवकांच्या विळख्यात अडकू नये म्हणून प्रशासनाने लोकप्रतिनिधींच्या राजवटीच्या पूर्वसंध्येला हा महत्वपूर्ण निर्णय मंजूर केला आहे. यापूर्वी या रुग्णालयांशी संबंधित विषय नगरसेवकांनी महासभेत घेतलेल्या उलटसुलट भूमिकांमुळे बारगळले होते. अंबरनाथ येथील वैद्यकीय रुग्णालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रुग्ण सेवेचा अभ्यास आणि वैद्यकीय उपचारांचे प्रात्यक्षिक घेण्यासाठी अंबरनाथ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी होईपर्यंत किमान सात वर्षासाठी कल्याण डोंबिवली पालिकेची कल्याण मधील रुक्मिणीबाई रुग्णालय, गौरीपाडा रुग्णालय आणि शक्तिधाम रुग्णालय सामंजस्य कराराव्दारे विद्यार्थी वापरा करता हस्तांतरण करण्यासाठी अंबरनाथ येथील शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी पालिकेकडे मागणी केली होती. महाविद्यालय इमारत वेळेत उभी राहिली तर त्या अगोदरही पालिका रुग्णालय वापरण्याची संलग्नता संपविण्याचा विचार महाविद्यालय प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. यासंदर्भातचा प्रशासकीय ठराव आयुक्त अभिनव गोयल, पालिका सचिव किशोर शेळके यांच्या स्वाक्षरीने करण्यात आला आहे.

# अंबरनाथ शेतकी सोसायटीच्या जागेवर जिल्हाधिकाऱ्यांची पाहणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**बदलापूर : अंबरनाथ शहरातील सुमारे २१० एकर क्षेत्रावर विस्तारलेल्या शेतकी संस्थेची जागा ताब्यात घेण्याचे आदेश आणि बदलापुरातील सांडपाणी व अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नावर उच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याच्या संदर्भात ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी बुधवारी अंबरनाथ व बदलापुर येथे पाहणी केली.**



यावेळी त्यांनी अंबरनाथच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, क्रीडा संकूल, बदलापुरातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र या ठिकाणी भेट देत पाहणी केली. याबाबतचा अहवाल पुढे सादर केला जाणार आहे. या भेटीत दोन्ही शहरातील न्यायालयाने आदेश दिलेल्या आणि सुनावणी सुरू असलेल्या प्रकरणातील स्थानिक प्रशासनाची झाडाझडती घेतल्याची माहिती मिळाली.

अंबरनाथ शहराच्या पूर्व भागात प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय उभारणीसाठी आवश्यक जागेवर न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यात उच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देत अंबरनाथ सामुदायिक सहकारी शेतकी सोसायटीची २१० एकर जागा शासनाने पुनर्ग्रहित करण्याचे आदेश दिले आहेत.

# सत्तास्थापनेनंतरही संघर्ष




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**उल्हासनगर :** महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडीनंतर उल्हासनगर महापालिकेत महायुतीची सत्ता स्थापन झाली. मात्र सत्तेच्या प्रारंभातच नाराजी, आरोप-प्रत्यारोप आणि पदवाटपावरून सुरू झालेला संघर्ष पाहता ही सत्ता आगामी पाच वर्षे टिकेल का, असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. भाजपचे निवडणूक प्रमुख प्रदीप रामचंदानी यांच्या वक्तव्यामुळे भाजप आणि शिंदे गटातील अंतर्गत मतभेद आता उघडपणे समोर येऊ लागले आहेत.

उल्हासनगरच्या राजकारणाचा रिमोट स्थानिक नेतृत्वाकडे नसून तो डोंबिवली आणि ठाण्यातील वरिष्ठ नेत्यांच्या हातात असल्याची भावना दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांमध्ये आहे. याच कारणामुळे निवडणुकीपूर्वी आणि निवडणूक काळात एकमेकांवर तीव्र आरोप करत लढलेले भाजप आणि शिंदे गट निकालानंतर मात्र राजकीय मजबुरीतून सत्तेत एकत्र आल्याचे चित्र दिसून येत आहे.

महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रदीप रामचंदानी यांचे विधान विशेष महत्त्वाचे ठरत आहे. शिंदे गटाने भाजपचे वरिष्ठ नेते फोडले नसते, तर आज भाजप स्पष्ट बहुमतासह सत्तेत असती. आमच्यावर अन्याय झाला असून महापौर निवड भाजपच्या सहमतीने झालेली नाही. मात्र केंद्र आणि राज्यात महायुती असल्याने उल्हासनगरमध्येही तोच राजकीय निर्णय स्वीकारावा लागला, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. या वक्तव्यातून भाजपमधील नाराजी उघड झाली असून सत्तास्थापनेचा प्रारंभीचा उत्साह ओसरताच असंतोषाचे सूर अधिक ठळक होताना दिसत आहेत.

**स्थायी समितीसाठी जोरदार रस्सीखेच**

महापालिकेतील खरी सत्ता मानली जाणारी स्थायी समिती आता राजकीय संघर्षाचे केंद्रबिंदू ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पालिकेच्या आर्थिक व्यवहारांवर तसेच विकासकामांवर नियंत्रण ठेवणाऱ्या या महत्त्वाच्या समितीच्या सभापती पदासाठी वरिष्ठ पातळीवर जोरदार लॉबिंग सुरू असल्याची चर्चा आहे. शिंदे गटाचा ज्येष्ठ व विश्वासू नेता स्थायी समितीच्या सभापतीपदी बसवण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसरीकडे भाजपही हे पद सोडण्याच्या मनस्थितीत नसल्याने दोन्ही पक्षांमध्ये संघर्ष अटळ मानला जात आहे. महापौरपद शिवसेनेच्या अश्विनी निकम यांना आणि उपमहापौरपद भाजपच्या अमर लुंड यांना मिळाल्यानंतर आता त्यांच्या कार्यकाळाबाबतही चर्चा सुरू झाली आहे. हा कार्यकाळ अडीच वर्षांचा असणार की सव्वा-सव्वा वर्षांचा, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही. जरी अद्याप प्रमुख सभापती पदांचे अधिकृत वाटप जाहीर झालेले नसले, तरी सत्तेत ५०-५० चा फॉर्म्युला लागू होईल, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## थोडक्यात महत्वाचे






### बदलापूर : प्रविण राऊत भाजपच्या स्विकृत नगरसेवकपदी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**बदलापूर :** कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंदेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करणाऱ्या उपशहरप्रमुख प्रविण राऊत यांनी गेल्या महिन्यात भाजपात प्रवेश केला होता. बुधवारी त्यांना भाजपच्या वतीने स्विकृत नगरसेवकपद देण्यात आले. या निर्णयामुळे शिंदेंच्या शिवसेनेला पुन्हा एकदा धक्का लागला असून भाजपची स्थानिक पातळीवरील ताकद वाढली आहे. नगरपरिषद निवडणुकीत भाजपने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहकार्याने शिवसेनेला नगराध्यक्ष पदाच्या निवडीत पराभूत केले. नगरसेवकांच्या गटाच्या संख्येबळावर शिवसेनेला दोन तर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला तीन सदस्यपद मिळाले. भाजपने शागोफ गोरे यांच्यासह रिक्त झालेल्या जागेसाठी प्रविण राऊत यांना संधी दिली आहे.

### येऊर परिसरात बिबट्याचा वावर?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

ठाणे शहरातील येऊरच्या डोंगरावरील हवाई दल (एअरफोर्स) स्थानकाच्या परिसरात बिबट्या आढळून आला आहे. या बिबट्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला असून हा व्हिडीओ नेमका कधी काढण्यात आला आहे, यावषियी अद्याप समजू शकलेले नाही. असे असले तरी, या भागात नागरिक सकाळ आणि सायंकाळच्या वेळेत फेरफटका मारण्यासाठी जात असून व्हायरल व्हिडीओमुळे या नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

# एकात्मतेच्या प्रदर्शनात संपन्न झाला श्री मलंग मच्छिंद्रनाथांचा पालखी सोहळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**डोंबिवली :** माघ पौर्णिमेच्या निमित्ताने कल्याणजवळील श्री मलंगगडावर श्री मलंग मच्छिंद्रनाथांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि कडक शिस्तीत पार पडला. मशालींचा लख्ख प्रकाश आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला होता. यंदाच्या पालखी सोहळ्यात श्रद्धा, परंपरा आणि संघटनात्मक शिस्त यांचे अभूतपूर्व दर्शन घडले. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, आंतरराष्ट्रीय बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह विविध हिंदुत्ववादी संघटना, धारकरी, वारकरी तसेच गड परिसरातील ग्रामस्थ हजारोंच्या संख्येने मध्यरात्री गडावर उपस्थित होते.

रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास पालखीचे प्रस्थान झाले. विसाव्यावर परंपरेनुसार प्रथम हिंदू भाविकांना दर्शनाचा मान देण्यात आला. पालखीला खांदा देण्याचा मान तळोजा येथील कोळीबांधवांनी, पिठाच्या दिव्यांची परंपरा दाभणे कुटुंबाने, तर मशालींचा मान आदिवासी व फासेपारधी समाजातील बांधवांनी निभावून सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले. पालखी सोहळा निर्विघ्न पार पडावा यासाठी ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून भाविकांसाठी पिण्याचे पाणी, तंबू तसेच स्वयंसेवकांद्वारे गर्दी नियंत्रणाचे नियोजन करण्यात आले होते. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गडावर, पायथ्याशी आणि संवेदनशील ठिकाणी विशेष पथके तैनात करण्यात आली होती. या सर्व नियोजनामुळे कोणतीही अनुचित घटना न घडता यात्रा यशस्वीरीत्या पार पडली.

पालखी दर्शनादरम्यान भाविकांनी 'मलंग मुक्ती'च्या घोषणा देत श्रद्धा आणि परंपरेच्या रक्षणाचा निर्धार व्यक्त केला. श्रद्धा, शांतता आणि शिस्त यांच्या त्रिवेणी संगमामुळे यंदाची यात्रा हिंदू एकतेचे प्रतीक ठरली.

# वाडा उप जिल्हा रुग्णालयाचा मार्ग मोकळा

## चार वर्षांपासून रखडलेला प्रकल्प अखेर मार्गी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ०४**

**वाडा : वाडा येथे प्रस्तावित १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय जागेअभावी गेली चार वर्षे रखडले होते. अखेर भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या प्रयत्नातून वनविभागाची पाच एकर जागा उपलब्ध होणार असल्याने या महत्त्वाकांक्षी रुग्णालयाचा मार्ग मोकळा झाला आहे.**

> **"गेल्या चार वर्षांपासून जागेच्या शोधात होतो. अखेर वनविभागाची जागा मिळाल्याने नवीन उपजिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग खुला झाला आहे," अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यादव शेखरे यांनी दिली.**

सध्या वाडा येथे केवळ ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय असून वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य सुविधा अपुऱ्या ठरत आहेत. गरोदर महिला, सर्पदंश तसेच अपघातग्रस्त रुग्णांना उपचारांसाठी ठाणे किंवा मुंबईचा प्रवास करावा लागत आहे. सन २०२१ मध्ये राज्य सरकारने ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास मंजुरी दिली होती. मात्र आवश्यक जागा उपलब्ध न झाल्याने हा प्रकल्प रखडला होता. दरम्यान, रुग्णालयासाठी एसटीची जागा मिळावी यासाठी जागा अदलाबदलीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यासंदर्भात तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यादव शेखरे, बांधकाम विभाग व एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका झाल्या; मात्र हा प्रस्ताव बारगळला. अखेर उमरोठे रोडलगत वनविभागाची जागा देण्यास मान्यता मिळाल्याने रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.



# मुंबई–आग्रा रोडवर रसायनयुक्त पाणी पादचाऱ्यांच्या आरोग्याला धोका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील विविध रस्त्यांच्या कडेला असलेल्या गटारा व नाले संदर्भात महापालिका प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे नियोजन होत नसल्याने नाले व गटारात तसेच सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणे व रासायनिक द्रव्य मिश्रीत सांडपाणी सोडले जात आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

मुंबई जुना आग्रारोड नारपोली येथील मुख्य रस्त्यावर कापडावर रंगाची रासायनिक प्रक्रिया करणाऱ्या डाईंग कंपन्यातील सांडपाणी सोडले जात असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे त्यामुळे महापालिका आयुक्त प्रशासनाने याबाबत दखल घेऊन कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.



नारपोली येथे मुख्य रस्त्यालगत असलेल्या डाईंगमधील रसायनयुक्त पाणी गटार सोडले जात असुन गटारातील दुर्गंधी सांडपाणी नारपोली चौकातील मुख्य रस्त्यावर अहोरात्र जमा होऊन वाहत आहे.त्यामुळे चौकाजवळच असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यां व पादचाऱी नागरिकांनाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कल्याण विभागाचे अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. भिवंडी शहरातील भिवंडी-ठाणे या मुख्य वाहतुकीच्या रस्त्यादरम्यान हे नारपोली गावात जाणारा चौक असून येथील गटारे साफ न केल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचलेले असते. नारपोली गावात जाणाऱ्या मार्गावर हिंदी भाषिक शाळा व पालिकेची देखील शाळा आहे.लगत लोकवस्ती सुध्दा आहे. येथे कापडावर प्रक्रिया करणाऱी डाईंग कंपनी असुन कापड रंगवणाऱ्या बॉयलरमधील गरम व रसायनयुक्त पाणी थेट गटारात सोडले जाते.त्यामुळे मुख्य रस्त्यावर सतत घाणेरडे पाणी साचलेले असते.नारपोली भागातील रहिवासी व शाळांमधील विद्यार्थ्यांना दररोज या रस्त्यावर ये जा करताना या साचलेल्या, दुर्गंधीयुक्त,रसायनयुक्त पाण्यातून जावे लागते.

रसायनयुक्त सांडपाण्यामुळे त्वचारोग,श्वसनाचा व संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.गेल्या १५ दिवसांपासून गटार चोकअप झाल्याने हे पाणी रस्त्यावर साचून रस्त्यावर वाहत आहे.वाहणाऱ्या या रासायनिक सांडपाण्यामुळे मुख्य रस्त्याचे मोठे नुकसान होत आहे. या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.त्यामुळे वाहनचालकांना गाडी चालवताना त्रास सहन करावा लागत आहे.रस्ता खराब झाल्याने रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे.तसेच दिवसा व रात्री सांडपाण्यात मोटारसायकल घसरून अपघाताचे छोट्या-मोठ्या घटना घडत आहेत.डाईंग कंपनी चे निष्काळजीपणामुळे रस्ता खराब झाल्याचा ठपका ठेवून या पूर्वी महापालिका प्रशासनाने नोटीस देऊन दंडात्मक कारवाई केली होती.महापालिका प्रशासनाने रस्त्यालगत गटारांची स्वच्छता करावी आणि सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या कंपनीच्या व्यवस्थापनावर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

> **नारपोली गावाकडे जाणाऱ्या मार्गावर गटारी वरील बांधकाम वाहनांच्या वाहतुकीमुळे तुटले असून त्यामुळे गटार चोकअप झाला आहे.तसेच सफाई विभागाने गटारातील घाण साफ न केल्याने गटारातून वाहणारे पाणी रस्त्यावर आले आहे. या प्रकरणी बांधकाम विभागाने दखल घेऊन निवडणुकीपूर्वी हे गटार दुरुस्तीचे काम मंजूर केले आहे. येत्या आठवड्यात हे काम सुरु करण्यात येईल.**
>
> **- सचिन नाईक,**
> **अभियंता,बांधकाम विभाग**
> **भिवंडी मनपा**

# जांभूळ गणपती मंदिराचा जीर्णोद्धार पिसाळ कुंटूबियांचा पुढाकार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आपल्या सरपंच पदाच्या कार्यकाळात ग्रामपंचायतीस तालुका जिल्हा तसेच राज्य पातळीवर विविध पुरस्कार मिळवून देऊन'जांभूळ, गावाचे नाव राज्यभर पोहचवणारे सरपंच परिक्षित हिराजी पिसाळ यांच्या संकल्पनेतून आणि पिसाळ कुटुंबियांच्या पुढाकाराने 'जांभूळ गावात ३४ते३५वर्षानंतर श्री गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार येत्या शुक्रवारी होत असून या निमित्तानं विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा परिसरातील गणेशभक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन सरपंच परिक्षित पिसाळ यांनी केले आहे. बुध्दी, समृद्धी व सौभाग्याचे आराध्य दैवत ,विघ्नहर्ता आणि सुखकर्ता म्हणून गणेशाचे पूजन केले जाते. कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात'अग्रपूज्यक, म्हणून गणेशाचे आशीर्वाद घेतला जातो. याशिवाय१४विद्या व६४कलांचा स्वामी म्हणून 'बाप्पा, मानला जातो, असे महात्म्य असलेला'गणपती,१९९१साली अनंत



चतुर्थीदिवशी क्रेशर मध्ये सापडतो, क्रेशर का बंद झाली म्हणून हिराजी पिसाळ हे मशीन पाहतात तर तळाशी त्यांना गणेशाच्या रुपाची अर्धमुर्ती मिळते. पिसाळ कुंटूबियांचे अध्यात्मिक गुरु शहाडचे चिंतामणी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्णाकृती मूर्ती घडविली व माघी गणेशोत्सवादिवशी विधीवत प्रतिस्थापना केली. तेंव्हा कुंटूबातील स्वर्गीय सुभाष यशवंतराव पिसाळ, स्वर्गीय सुनिता सुभाषराव पिसाळ, हिराजी यशवंतराव पिसाळ, सौ नम्रता हिराजी पिसाळ, दिंगबर पिसाळ, दिप्ती पिसाळ, भगवान पिसाळ, भक्ती पिसाळ, जतिन पिसाळ, रोहिणी पिसाळ, आणि सरपंच परिक्षित हिराजी पिसाळ व सौ अनुजा परिक्षित पिसाळ,या सर्वांनी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला. वर्षभर मेहनत घेतल्यानंतर अखेरीस आज अंबरनाथ जांभूळ रस्त्याच्या बाजूला अतिशय सुंदर, आकर्षक, देखणे आणि प्रशस्त असे मंदिर उभे राहिले, त्याचा जिर्णोद्धार सोहळा मिती माघ कृ.५.शके१९४७,शुक्रवार दि ६/२/२०२६रोजी आयोजित केला आहे. यावेळी हरिपाठ, श्री संतसेवा हरिपाठ मंडळ जांभूळ व बदलापूर पंचक्रोशी तर संध्याकाळी किर्तनकार-इतिहास वर्णक, ह,भ,प,इंद्रजित महाराज रसाळ(बीड)यांचे किर्तन तर सांय७:३०वा पासून महाप्रसाद(भंडारा)चे सोय करण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील गणेशभक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे अवाहन सरपंच परिक्षित पिसाळ यांनी केले आहे.

# १० वी व १२ वी परीक्षा काळात झेरॉक्स दुकाने राहणार बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : फेब्रुवारी–मार्च 2026 या कालावधीत होणाऱ्या इयत्ता 12 वी व 10 वीच्या सार्वजनिक परीक्षांचा गैरप्रकारमुक्त व शांततेत कारभार पार पडावा यासाठी रायगड जिल्ह्यात परीक्षा केंद्रांवर जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये (नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्र वगळून) हा मनाई आदेश जारी केला आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता 12 वी) परीक्षा दि. 10 फेब्रुवारी ते 18 मार्च 2026 या कालावधीत, तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता 10 वी) परीक्षा दि. 20 फेब्रुवारी ते 18 मार्च 2026 या कालावधीत होणार आहेत. या परीक्षांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व परीक्षा वितरण केंद्रे व परीक्षा केंद्रांवर संबंधित निर्बंध लागू राहणार आहेत.

या मनाई आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या 50 मीटर परिसरात मोबाईल फोन, पेजर वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच एस.टी.डी. बुथ, झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन चालू ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक पेपरच्या 24 तास आधीपासून परीक्षा केंद्रांच्या 50 मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच प्रत्येक पेपरच्या एक तास आधीपासून ते पेपर संपल्यानंतर एक तासापर्यंत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परीक्षार्थी विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी वगळता इतर कोणत्याही व्यक्तीस परीक्षा केंद्राच्या 50 मीटर परिसरात फिरण्यास मनाई राहणार आहे. परीक्षेसाठी आवश्यक साहित्याव्यतिरिक्त कोणतेही आक्षेपार्ह साहित्य वापरण्यासही बंदी घालण्यात आली आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 नुसार कायदेशीर कारवाई व शिक्षा करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# बिरसा मुंडा स्मारक उभारणीस मंजुरी

## आमदार विलास तरेंच्या ठरावास संमती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर**. : पालघर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आदिवासी स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचे स्मारक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर उभारण्याचा ठराव सर्व सदस्यांच्या एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावामुळे पालघर जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जडणघडणीत महत्त्वाची भर पडणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

आमदार विलास तरे यांनी ठराव मांडताना सांगितले की, भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात केलेला संघर्ष, आदिवासी समाजासाठी केलेले बलिदान आणि सामाजिक जागृतीचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. मात्र, पालघर जिल्ह्यात त्यांच्या स्मृती जतन करणारे ठोस स्वरूपाचे स्मारक अद्याप उभारलेले नाही. त्यामुळे त्यांच्या कार्याचा प्रसार करणे आणि आदिवासी समाजाच्या इतिहासाला अधिक दृढ स्वरूप देणे या उद्देशाने हा ठराव मांडला गेला.

या ठरावास आमदार शांताराम मोरे यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांनीही भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि आदिवासी समाजाच्या इतिहासाला आणि स्वाभिमानाला चालना देणारा हा निर्णय असल्याचे मत व्यक्त केले. उपस्थित सर्व सदस्यांनी ठरावास पाठिंबा दर्शविला आणि कोणताही विरोध न होता हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव मंजूर होताच सभागृहात समाधान व्यक्त केले गेले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्मारक उभारल्यास नागरिकांना, विद्यार्थी-युवकांना आणि पर्यटकांना भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याची ओळख होईल. तसेच आदिवासी समाजाच्या इतिहासाला शासकीय पातळीवर मान्यता मिळाल्याचा ठोस पुरावा म्हणून हे स्मारक उभे राहील.

आमदार विलास तरे यांनी सांगितले की, हा ठराव केवळ स्मारक उभारण्यापुरता मर्यादित नाही, तर आदिवासी समाजाच्या संघर्ष, त्याग आणि स्वाभिमानाला दिलेला सन्मान आहे. प्रशासनाने तातडीने पुढील प्रक्रिया पूर्ण करून स्मारक उभारणीचे काम सुरू करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या ऐतिहासिक निर्णयामुळे पालघर जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशात नवा अध्याय सुरू झाला असून, आदिवासी समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध स्तरांवरील स्थानिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, हा निर्णय जिल्ह्याच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून नोंदवला जाईल.

# मतदान शांततेत होण्यासाठी रायगड जिल्ह्यात मनाई आदेश

## 7 फेब्रुवारीला मतदान, 9 फेब्रुवारीला मतमोजणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक–२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून रायगड जिल्ह्यात दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान व दि. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडावी, यासाठी जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये संपूर्ण जिल्ह्यात (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) मनाई आदेश जारी केला आहे.

हा मनाई आदेश दि.7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी 24 तास अगोदरच्या कालावधीमध्ये खालील कृत्य करण्यास मनाई करण्यात आली आहे.

या कालावधीत पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनिक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे.

राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या जिल्हा परिषद व पंचायत समिती हद्दीमध्ये मतदान होणार आहे, तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते / नेते यांना त्या जिल्हा परिषद व पंचायत समिती हद्दीमध्ये थांबणेस मनाई आहे.

लाऊडस्पीकर वापरास मनाई आहे. मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेवून जाण्यास मनाई आहे. (निवडणुकीशी संबंधीत कामाकरिता नियुक्त केलेले अधिकारी / कर्मचारी व सुरक्षेकरीता नियुक्त केलेले अधिकारी / कर्मचारी वगळून). मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात लाऊडस्पीकर/ मेगाफोन वापरणे / आरडा-ओरड करणे / गोंधळ घालणे/ गैरवर्तन करणे इत्यादी कृती करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेवून जाण्यास मनाई आहे. (अपवाद -मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी / कर्मचारी, ज्या व्यक्तीस SPG/Z+ दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेवून जाता येईल), मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे. मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी, त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह, पक्षाचे नाव नसावे. मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने असल्यास त्याठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाहण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे.. मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग /वृध्द / आजारी मतदारांना घेवून येणारी वाहने). मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसराचे आत राजकीय पक्षांचे / उमेदवारांचे निवडणूक बुथ लावण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या 100 मीटर बाहेर निवडणूक बुब लावताना खालील अटीचे पालन करावे. बुध लावण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी व बुथ लावण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगावू माहिती द्यावी. प्रत्येक बुथवर कमाल एक टेबल, दोन खुर्चा असाव्यात.. प्रचार कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष प्रचाराला भरीव चालना देण्यासाठी, मतदार संघाच्या बाहेरुन पाठीराख्यांना आणण्यासह त्यांच्या समर्थकांची हलवाहलव करतात. हो वस्तुस्थीती लक्षात येता, प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघात कोणताही प्रचार होऊ नये यासाठी, बाहेरुन आणलेले आहेत व जे त्याच्या / तिच्या मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते / पक्ष कार्यकर्ते / मिरवणुकीतील कार्यकर्ते / प्रचार कार्यकर्ते, इत्यादींना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही, कारण प्रचार संपल्यानंतर, त्यांच्या निरंतर उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण धोक्यात येऊ शकते.

हा मनाई आदेश हा रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघाच्या हद्दीत दि.05 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 12.00 वा. पासून ते दि. 07 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 7.00 वा. पर्यंत अंमलात राहील.

या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाण्यातून मृगाक्षी नितीन राणे सहावीमध्ये प्रथम

## ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने इस्रोला जाणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे रणजित यादव यांच्या संकल्पनेतुन मिशन भरारी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या उपक्रमाअंतर्गत इ.५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांची केंद्रस्तर,तालुकास्तर व जिल्हास्तर अशी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत यशस्वी गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना जिल्हा परीषद ठाणेमार्फत इस्रो येथे सहलीत सहभाग व सन्मानपत्र देउन गौरवण्यात येणार आहे. या परीक्षेत जि.प.शाळा म्हसा येथील ६ वी तील विद्यार्थीनी कु.मृगाक्षी नितीन राणे हिने ९५% गुण मिळवून जिल्ह्यातुन पहीला येण्याचा मान मिळवला. मृगाक्षीचे आई वडील नितीन राणे व सौ.अर्चना राणे हे दोघे जि.प.शाळा बोरीवली येथे शिक्षक आहेत.आपल्या मुलीला जिल्हा परीषदेच्याच शाळेत शिक्षण देउन त्यांनी समाजासमोर आदर्श ठेवला आहे. तसेच अगदी थोड्या दिवसातच आपल्या कष्टाने त्यांनी बोरीवली शाळा नावारुपाला आणली आहे. भरारी परीक्षेतील यशाबद्दल मृगाक्षीचा तालुक्यातुन गौरव होत आहे. तिला प्रेरणा देणारे गटशिक्षणाधिकारी मधुकर




घोरड , मार्गदर्शन करणारे म्हसा शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण घागस , प्रकाश म्हाडसे,नितीन घागस,शिवाजी राऊत , घरत मॅडम, दीपक हिंदुराव सर शिक्षक,पालक वर्गांचेही अभिनंदन होत आहे.

# भविष्यवेध



**गुरूवार**
**०५ फेब्रुवारी २०२६**

### मेष
सरकारी कामात धोरणे आणि नियमांकडे पूर्ण लक्ष दिले तर तुम्हाला काम करणे सोपे जाईल. आज तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत घाई करणे टाळावे लागेल.

### वृषभ
महत्वाचं काम हाताळण्यात खूप यशस्वी व्हाल. तुम्हाला प्रत्येक बाबतीत सकारात्मक राहावे लागेल. आज काही जुन्या समस्यांवर मित्रांसोबत चर्चा होईल.

### मिथुन
कौटुंबिक कामात तुमच्या पैशाची आवश्यकता भासेल. ऑनलाइन नवीन पदार्थ शिकण्याचा प्रयत्न करतील. वडिलांचा पाठिंबा तुमच्यासोबत असेल.

### कर्क
लेखकांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे, त्यांच्या लेखनाचे कौतुक केले जाईल. ऑफीसमध्ये काम करणाऱ्यांना महत्वाची जबाबदारी मिळेल. दिवस लकी ठरेल.

### सिंह
तुमचे वैयक्तिक आयुष्य चांगले राहील. जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर अनुभवी व्यक्तीचा सल्ला नक्कीच घ्या, चांगले मत मिळेल.

### कन्या
काही कौटुंबिक जबाबदाऱ्या सोपवल्या जातील, ज्या तुम्ही पूर्ण कराल. तुम्ही जे काही केले आहे त्यामुळे सर्वजण खूप आनंदी असतील.

### तुळ
महत्त्वाच्या कामाबद्दल आणि नात्याबद्दल विचार आणि योजना कराल. कुटुंबाशी संबंधित समस्या संपण्याची शक्यता आहे. पुन्हा प्रयत्न केल्यास यशस्वी होऊ शकता.

### वृश्चिक
वडील मुलांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील. या राशीचा नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी आज बाजार विश्लेषण करणे चांगले राहील.

### धनु
ऑफिसमध्ये एक नवीन जबाबदारी मिळेल, जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडू शकाल. वाणिज्य शाखेचे विद्यार्थी मार्केटिंग समजून घेण्यासाठी शिक्षकांची मदत घेतील.

### मकर
तुम्ही तुमच्या व्यस्त दिनचर्येतून तुमच्या मुलांसाठी थोडा वेळ काढाल, तुम्ही सणानुरूप तुमचे घर सजवाल. तुम्ही तुमच्या बोलण्यावर संयम ठेवावा.

### कुंभ
एखाद्या गोष्टीबद्दल जास्त हट्टी राहण्याचे टाळावे. उत्तम योजना बनवून तुमचा दिवस आनंदी कराल. थोडा वेळ एकटे घालवाल, पण स्वतःसोबत राहून बरं वाटेल.

### मीन
तुम्हाला आर्थिक लाभ आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. लहान मुले आज खूप आनंदी असतील आणि नवीन गोष्टींचा शोध घेतील.

# भिवंडीत थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी अभय योजना जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : थकीत मालमत्ता करावरील व्याजात १०० टक्के सवलत देणारी अभय योजना ३१ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती भिवंडी महापालिका प्रशासनाने दिली.एप्रिल २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनात मालमत्ता कर वसुली कर्मचाऱ्यांनी ६५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात यश मिळविले आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच कालावधीत ४६ कोटी रुपयांची वसुली झाली होती. यावेळी कर वसुलीत १९ कोटी रुपयांची वाढ झाल्याची माहिती मालमत्ता कर विभागाचे महापालिका उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर यांनी दिली. नोव्हेंबर २०२५ मध्ये तीन टप्प्यांत व्याजदरात सवलत देणारी अभय योजना लागू केली होती. ७नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरदरम्यान १०० टक्के व्याजदरात सवलत योजनेत २५ कोटी ६४ लाख वसुली झाली होती. त्यानंतरच्या ७५ टक्के व्याजदरात सवलत देण्याच्या टप्प्यात १३ कोटी १३ लाख अशी एकूण ३८ कोटी ७७ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला.



# पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या रापमच्या सर्व बस फेऱ्या रद्द

**मुंबई-पुणे महामार्गावर केमिकल वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली असून गेल्या 24 तासांपासून वाहतूक ठप्प झाली आहे. अशातच पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या सर्व एसटी बसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. वाहतूक कोंडी कायम असल्यानं एसटी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.**

●●●●●●

**■ मुंबई सेंट्रल, दादर, ठाणे, बोरीवली कडे जाणाऱ्या सर्व एस टी बसेसच्या फेऱ्या रद्द**

पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या सर्व एसटी बसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे. मुंबई-पुणे महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपोलिन गॅस टँकर उलटल्याने मोठी गळती सुरु होती. यामुळं मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. अद्यापही मोठी वाहतूक कोंडी असल्याचे असटी प्रशासनाने बसच्या फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई सेंट्रल, दादर, ठाणे, बोरीवली कडे जाणाऱ्या सर्व एस टी बसेसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुढील काही तासासाठी बसेस फेऱ्या बंद राहणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

**■ राज्यातील विविध विभागांमधील एकूण 139 बस फेऱ्या रद्द**

पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळं मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून या घटनेचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांवर झाला आहे. परिवहन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, या अपघातानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळं राज्यातील विविध विभागांमधील एकुण 139 बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये 73 ई-शिवनेरी व 66 इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे. तसेच, या एक्सप्रेस वेवर महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एकूण 163 वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील 46, सोलापूर विभागातील 36, पुणे विभागातील 20, सांगली विभागातील 18, कोल्हापूर विभागातील 13, पालघर विभागातील 12, ठाणे विभागातील 11 आणि मुंबई विभागातील 7 वाहनांचा समावेश आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, परिस्थितीचा आढावा घेऊन पर्यायी व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने कळविले आहे.

## प्रवाशांचे हाल..

या भीषण कोंडीचा फटका आता दुसऱ्या दिवशीही कायम आहे. काल संध्याकाळपासून सुरू झालेला हा ट्रॅफिक जाम अद्याप पूर्णपणे सुरळीत झालेला नाही, आणि यामुळे हजारो प्रवासी अडचणीत सापडले आहेत. या कोंडीचा थेट परिणाम आता राज्य परिवहन सेवेलाही बसला आहे. मुंबई–पुणे दरम्यान धावणारी महाराष्ट्र शासनाची प्रीमियम बस सेवा 'शिवनेरी' सध्या बंद ठेवण्यात आली आहे. महामार्गावरील परिस्थिती लक्षात घेऊन ही सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. मुंबईहून पुण्याकडे आणि पुण्याहून मुंबईकडे जाणारे अनेक नागरिक बस स्थानकांवर तासन्तास अडकून पडले आहेत. काही ठिकाणी प्रवाशांना तीन ते चार तासांहून अधिक प्रतीक्षा करावी लागत असल्याची माहिती समोर येते आहे. कामानिमित्त, शैक्षणिक कारणांसाठी आणि वैद्यकीय गरजांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अचानक बस सेवा बंद झाल्यामुळे पर्यायी प्रवासाची सोय शोधताना प्रवाशांची धावपळ सुरू आहे. महामार्गावरील वाहतूक कधी पूर्णपणे सुरळीत होणार आणि शिवनेरी सेवा कधी पुन्हा सुरू होणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नवी मुंबईकरांसाठी १५० नव्या गाड्यांची खरेदी जुन्याच मार्गावर अधिकच्या फेऱ्या

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ०४**

मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतुकीचा मोठा भार उचलणाऱ्या नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाने यंदाच्या वर्षात प्रवाशांना वाढीव फेऱ्यांची सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात विजेवर धावणाऱ्या २९५ बसेसपैकी ३० गाड्यांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळून आल्याने प्रवाशी फेऱ्या कमी झाल्या आहेत. यामुळे उपलब्ध बसेसवरील प्रवाशांचा भार वाढला असताना परिवहन प्रशासनाने सीएनजीवर धावणाऱ्या नव्या १५० बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या मार्च अखेरीस या बसगाड्या ताफ्यात दाखल होणार आहेत. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एनएमएमटीच्या बळकटीकरणासाठी मागील अर्थसंकल्पात ठोस अशी आर्थिक तरतूद केली होती.

या अर्थसंकल्पात आयुक्तांनी नव्या बस खरेदीचा प्रस्तावही मांडला होता. एनएमएमटीच्या ताफ्यात प्रशिक्षित वाहक-चालकांची पुरेशी संख्या आहे. त्यामुळे भाडेपट्ट्यावर बस चालविण्याऐवजी नव्या गाड्या खरेदी करून उपलब्ध कर्मचाऱ्यांसह त्या वेगवेगळ्या मार्गावर सुरू करण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. त्यानुसार सीएनजीवर धावणाऱ्या १५० नव्या बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# शरद पवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भेटीला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ०४**



**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बारामतीमधील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी भेटीला गेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे आधी सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थाली पोहोचले. त्यानंतर शरद पवार हे देखील सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानाच्या दिशेला भेटीसाठी निघाल्याची माहिती समोर आली. शरद पवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली. या भेटीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर शरद पवार हे पहिल्यांचा त्यांची भेट घेत आहेत. सहयोग सोसायटी येथे कार्यकर्त्यांची मोठी गर्दी जमली आहे.

**बारामतीत सहयोग सोसायटीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांचं निवासस्थान आहे. अजित पवार यांच्या निधन नंतर पवार कुटुंबियांच्या सांत्वनपर भेटीसाठी राज्यासह देशाभरातील अनेक जण सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी येत आहेत. रोहित पवार यांच्यासह त्यांचे आई-वडील हे देखील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी दाखल झाले आहेत. संपूर्ण पवार कुटुंबिय इथे आले असल्याची माहिती आहे. शरद पवार यांच्यासोबत त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार या देखील सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी आले आहेत.**

# डोंबिवली पश्चिमेला फेब्रुवारीतच पाणीटंचाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ०४**

**डोंबिवली :** ऐन फेब्रुवारी महिन्यातच डोंबिवली पश्चिम भागाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून प्रभाग क्रमांक २२ मधील सह्याद्रीनगर, राजूनगर, सरोवरनगर आणि महालक्ष्मी चौक परिसरात नागरिकांचे हाल सुरू आहेत. या भागात अत्यंत कमी दाबाने आणि अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम होत आहे.

अनेक ठिकाणी तासाभरापेक्षाही कमी वेळ पाणी येत असून पहाटेच्या वेळी पाणीपुरवठा होत असल्याने गृहिणींना मोठी ओढाताण सहन करावी लागत आहे. महापालिकेचे टँकर अपुरे पडत असल्याने नागरिकांना खासगी टँकरसाठी तब्बल २ ते २.५ हजार रुपये मोजावे लागत आहेत.

दरम्यान, अमृत योजना रखडली असून राजूनगर आणि गरिबाचा वाडा येथील पाण्याच्या टाक्यांची कामे संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत महापालिकेने मोफत किंवा सवलतीच्या दरात वाढीव टँकर उपलब्ध करून द्यावेत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**१५ वा वित्त आयोगांतर्गत (आरोग्यवर्धीनी केंद्र)**

**- जाहिरात -**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकडील १५ वा वित्त आयोगांतर्गत बहुद्देशीय कर्मचारी (फक्त पुरुष) या संवर्गातील रिक्त पदे २९ जून २०२६ पर्यंत कालावधीसाठी करार पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | एकुण रिक्त पदे | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि. मा.प्र | इ. मा. व | सा.शै. मा. प्र. | आ. दु .घ. | खुला |
| १ | बहुद्देशीय कर्मचारी (पुरुष) Multi Purpose Worker (Male) | ५१ | १ | ४ | १ | २ | २ | १ | १ | १३ | ७ | ७ | १२ |

** दि: ०४/११/२५ रोजी बहुउद्देशीय कर्मचारी यांच्या करिता प्रसिद्ध करण्यात आलेली निवड प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे**

वरील पदांसाठी जाहीरात व शैक्षणिक अर्हता, अनुभव, मानधन, अटी व शर्ती, सर्वसाधारण सूचना, मुलाखतीचे ठिकाण व वेळ, अर्जाचा नमुना इत्यादी तपशीलवार माहिती कल्याण डोंबिवली महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदरहू संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/मुका/९०३**
**दि. ०४/०२/२०२६**

**सही/-**
**अभिनव गोयल (भा.प्र.से)**
**अध्यक्ष, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,**
**तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**


# कर थकबाकीदारांवर कडक कारवाई करा -आयुक्त सौरभ राव




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी ■ ठाणे / दि. ०४**

ठाणे महापालिका हद्दीतील ज्या करदात्यांनी अद्यापपर्यत आपला मालमत्ता कर भरलेला नाही अशा करदात्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले. मागील एक ते दोन महिन्यापासून मालमत्ता कर वसुली अपेक्षेपेक्षा कमी होत असल्याने नाराजी व्यक्त करत जे कर भरत नाही अशा निवासी मालमत्ताधारकांचे नळसंयोजन खंडीत करणे, कर न भरणाऱ्याअनिवासी मालमत्ता जप्ती करण्याच्या कडक सूचनाही आयुक्तांनी बैठकीत दिल्या.

सन 2025-26 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (दिनांक 03 फेब्रुवारी 2026) आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (२) श्री. प्रशांत रोडे, उपायुक्त श्री. जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त मिताली संचेती तसेच सहायक आयुक्त व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मागील एक ते दोन महिन्यांपासून मालमत्ता कराची वसुली अपेक्षेपेक्षा कमी होत असल्याने आयुक्तांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. ज्या करदात्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांच्यावर तात्काळ जप्ती, वॉरंट बजावणे, नळ संयोजन खंडीत करुन, पाणीपुरवठा बंद करणे नळजोडणी व इतर सेवा खंडित करण्याचे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.

अनिवासी मालमत्तांबाबत विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून १० फेब्रुवारीपर्यंत ही मोहिम सुरू राहणार आहे. या मोहिमेत अनिवासी मालमत्ताधारकांवर जप्ती व सील करण्याची कडक कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी सर्व सहायक आयुक्त व परिमंडळ उपायुक्तांना दिले आहेत. तसेच, कर वसुली वाढविण्यासाठी विविध ठिकाणी मोठ्या गृहसंकुलांमध्ये विशेष शिबिर आयोजित करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी संभाव्य अप्रिय कारवाई टाळण्यासाठी तात्काळ महापालिकेकडे मालमत्ता कर जमा करावा, असे आवाहन करण्यात आले. सन 2025-26 या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके ऑनलाईन पध्दतीने भरण्याकरिता महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ई सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच फेब्रुवारी व मार्च 31.03.2026 या कालावधीमधील सर्व शनिवार, रविवार तसेच सर्व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी (दि.03 मार्च, 2026 रोजी धुलीवंदन असल्याने हा दिवस वगळून) सकाळी 10.30 ते 4.30 तसेच सर्व रविवार सकाळी 10.30 ते 1.30 या वेळेत कर संकलनाकरिता करवसुली संकलन केंद्र व मुख्य कार्यालयही कार्यान्वीत ठेवण्यात येणार आहेत.

**THANE MUNICIPAL CORPORATION**
**PROPERTY TAX DEPARTMENT**
**PROPERTY TAX RECOVERY UPTO 03-02-2026**

| SR | PRABHAG SAMITI | RECOVERY |
|---|---|---|
| 1 | UTHALSAR | 37.85 |
| 2 | NAUPADA KOPRI | 74.12 |
| 3 | KALWA | 17.81 |
| 4 | MUMBRA | 23.02 |
| 5 | DIVA | 21.08 |
| 6 | WAGLE ESTATE | 21.87 |
| 7 | LOKMANYA SAVARKAR | 20.54 |
| 8 | VARTAK NAGAR | 88.77 |
| 9 | MAJIWADA MANPADA | 175.01 |
| 10 | OTHER | 76.12 |
| | GRAND TOTAL | 556.19 |


## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**निविदा सुचना क्र. उमपा/विद्युत/टे-०२/५२, ५३, ५४ (सन २०२५-२०२६)**

**उल्हासनगर महानगपालिकेच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे इच्छुक एजन्सी/ ठेकेदारांकडून "ई-निविदा/ निविदा प्रकियेव्दारे दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा http://Mahatenders.gov.in/nicgep/app?component =%24DirectLink&page=FrontEndTenderDetails&Service= direct&Session=T&sp=S9EoBn90rloh.... या वेबसाईट वरुन मागवित आहे.**

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | निविदा अनामत रक्कम (EMD) | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका, मुख्यालयातील मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, गटनेता, स्थायी समिती सभागृह इ. ठिकाणच्या दालनातील विद्युत व्यवस्थेचे नुतनीकरण करणेबाबत. | १७,१६,६००/- | १७,५००/- | २,०६५/- सर्व करांसहीत | निविदा कार्यदिशाच्या किंमतीवर ५% | ३० दिवस |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका, कार्यक्षेत्रातील विविध परिसरातील खराब व जीर्ण झालेली दिवाबत्तीचे पोलसहीत एल ई डी दिवाबत्ती बदली करणेबाबत. | १५,९७,८००/- | १६,०००/- | १,८८८/- सर्व करांसहीत | निविदा कार्यदिशाच्या किंमतीवर ५% | ३० दिवस |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका, क्षेत्रातील विविध ठिकाणच्या जीर्ण व खराब झालेल्या दिवाबत्ती बदली करणेकरिता Energy Effcient Led Fixture ची आवश्यकता असलेबाबत. | १६,००,९००/- | १६,५००/- | १,९४७/- सर्व करांसहीत | निविदा कार्यदिशाच्या किंमतीवर ५% | ३० दिवस |

**निविदा बाबत सविस्तर माहिती http://Mahatenders.gov.in/nicgep/app?component =%24DirectLink&page= Front EndTenderDetails& Service=direct&Session=T&sp=S9EoBn90rloh... माहिती या वेबसाईट वर उपलब्ध आहे.**

**जावक क्रमांक :**
**उमपा/पीआरओ/५१९/२०२६**
**दि. ०४/०२/२०२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (विद्युत)**
**उल्हासनगर महानगरपालिका**

ठाणे ■ गुरुवार
०५ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# आत्मा मलिक इन्स्टिट्यूटमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद :** मोहिली-अघई येथील आत्मा मलिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चमध्ये माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०१४ पासूनच्या माजी विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील. मेळाव्यात जुनी आठवणी शेअर करण्यासोबत शैक्षणिक आणि व्यावसायिक अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याची संधी मिळणार आहे. संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासह हा कार्यक्रम पार पडणार असून, माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. दि. शनिवार 7 फेब्रुवारी रोजी या मेळावा पार पडणार असून यामध्ये संस्थेचे सन 2014 पासूनचे माजी विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांना एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्याची तसेच आपले शैक्षणिक व व्यावसायिक अनुभव सध्याच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची संधी मिळणार आहे.

# शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय ॲप नोंदणीसाठी आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** हवामान बदल, बाजारातील चढ उतार आणि शेतीविषयक अचूक माहितीसाठी असणाऱ्या मर्यादांमुळे शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने माहिती मिळावी, यासाठी कृषी विभागाने 'महाविस्तार एआय' ॲप विकसित केले आहे. गुगल प्ले स्टोअरवर जाऊन आजच महाविस्तार ए आय ॲप डाउनलोड करा आणि शेतीत डिजिटल क्रांतीचा भाग व्हा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे. ॲपची लिंक https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.mahapocra.mahavistaarai आहे.शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अचूक, वेळीच व विश्वासार्ह कृषी माहिती मिळावी, या उद्देशाने कृषी विभागाने राज्यभर 'महाविस्तार एआय' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप सुरू केले आहे. महाविस्तार एआय ॲप हे शेतकऱ्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करणारे एक प्रभावी डिजिटल व्यासपीठ आहे. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे ॲप शेतकऱ्यांना रिअल टाइम हवामान अंदाज, बाजारभाव, कृषी तज्ज्ञांचा सल्ला तसेच आधुनिक शेती पद्धतीचे मार्गदर्शन एका क्लिकवर उपलब्ध करून देते. एआय चॅटबॉटद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे मिळतात. या ॲपबाबत कृषी विभागाने जिल्हाभर जनजागृती केली आहे. या ॲपच्या माध्यमातून हवामान अंदाज, पीक लागवडीच्या पद्धती, कीड व्यवस्थापन, खतांचा योग्य वापर, मृदा आरोग्य, गोदाम व्यवस्था तसेच डीबीटीवरील विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. बाजारभावाची अद्ययावत माहिती, विविध कृषी योजना, अनुदान व पीकविमा योजनांची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲपवर नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे रहिवाशी व वाहन चालक धुळीने त्रस्त

## रस्त्याचे काम लवकर पुर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा



**मुरबाड शहरालगत असलेल्या माऊली नगर परिसरात मुरबाड-म्हसा-कर्जत या राज्य रस्ते विकास महामंडळाच्या रस्त्याचे कांक्रीटीकरण अर्धवट अवस्थेत ठेवल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. म्हसा यात्रेपूर्वी रस्ता खोदून ठेवून काम थांबवल्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले असून, वाहनचालकांसह परिसरातील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(दिलीप पवार) :** मुरबाड-म्हसा-कर्जत या राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून मुरबाड शहराशेजारील माऊली नगरच्यापुढे म्हसा यात्रेपुर्वी कांक्रीटीकरण करण्यासाठी रस्ता खोदून ठेवला आहे. या खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे वाहन चालक यांना धुळीचा प्रचंड त्रास तर होतच आहे परंतू शेजारील रहिवाशांना देखील या उडणाऱ्या धुळीचा त्रास होत आहे. यामुळे लहान मुलांना श्वसनाचे, खोकल्याचे तसेच दम्याचे आजार होऊ लागले आहेत. याच बरोबर घरातील इलेक्ट्रिक उकरणे टिव्ही, फ्रीज, ए. सी, संगणक, भांडी धुळीमुळे खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

गेले तीन ते चार वर्ष माऊली नगरचा प्रवेशद्वार ते पुढे फक्त १०० मीटर हा रस्ता हा काही तांत्रिक कारणामुळे रखडला होता. त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडत होते. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी यासंदर्भात संबंधित ठेकेदार जिजाऊ कंन्ट्रक्शनला रस्ता पुर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार कामाला सुरवात देखील झाली परंतु रस्त्याची एक बाजू म्हसा यात्रेपुर्वीच खोदून ठेवली असून सध्यस्थितीला काम बंदच आहे. जेमतेम शंभर मीटर रस्ता खोदून ठेवून शंभर दिवस होत आले तरी काम पुर्ण होत नसल्याने नागरिकांनी प्रचंड नाराजी व्यक्त करत लवकर रस्ता पुर्ण न झाल्यास ठेकेदारा विरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# ५ फेब्रुवारीपासून विठ्ठलवाडी-जुगाईवाडी बससेवा नियमित

## सातारकर रहिवाशी संघ, बदलापूर आणि ग्रामपंचायत घोट यांच्या पाठपुराव्याला यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** विठ्ठलवाडी ते जुगाईवाडी बससेवा आज 5 फेब्रुवारी पासून नियमित सुरु होणार असून कल्याण डोंबिवली परिसरातील स्थानिक नागरीकाना त्यांच्या गावी जाणे सोयीचे होणार आहे. बससेवा सुरु करण्यासाठी सातारकर रहिवाशी संघ, बदलापूर आणि ग्रामपंचायत घोट यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. पहिली बससेवा विठ्ठलवाडी बस आगारातून रात्री ९ वा, निघून ती जुगाईवाडी येथे पहाटे ४:३० वाजता पोहोचणार आहे.

सातारा जिल्ह्यासह पाटण तालुक्यातील घोट ग्रामपंचायत परिसरासह गावांतील अनेक नागरिक हे शैक्षणिक व नोकरीच्या कामानिमित्त कल्याण, अंबरनाथ, बदलापूर या परिसरात वास्तव्यास आहेत. यापूर्वी तारळे येथून परेल (मुंबई) करिता असणारी बस बंद झाल्याने परिसरातून पनवेल, मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या नागरिकांना प्रवासाचे दुसरे कोणतेच माध्यम नाही. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात खाजगी वाहनांचा वापर करावा लागतो मात्र अनेकदा खाजगी वाहने उपलब्ध देखील होत नाही. तसेच तो पर्यायी खूप खर्चिक सुद्धा आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी त्यांना त्यांच्या गावी जाता यावे यासाठी विठ्ठलवाडी ते जुगाईवाडी बससेवा सुरु करण्यासाठी सातारा रहिवाशी संघ, बदलापूर, ग्रामपंचायत घोट सरपंच गौरी सोनावले, उपसरपंच अक्षय शिंदे यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी केली असून वारंवार पाठपुरावा केला.

अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून आज ५ फेब्रुवारी पासून विठ्ठलवाडी आगारातून पहिली बस निघणार आहे. या बसचे प्रवासी थांबे – कल्याण – पनवेल – सातारा - नागोठाणे – सासपडे – तारळे – आंबळे – घोट – जुगाईवाडी असे आहेत. नागरिकांनी बससेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन सातारकर रहिवाशी संघ, बदलापूर आणि ग्रामपंचायत घोट यांनी केले आहे.

# कल्याण आरटीओ कार्यालयाकडून अधिकृत रिक्षा स्टँडची यादी जाहीर

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण अंतर्गत ४४६ अधिकृत रिक्षा स्टँड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण अंतर्गत असलेल्या रिक्षा स्टँडची यादी जाहीर करण्यात आली असून अंतर्गत एकून ४४६ स्टँड असल्याचे उप प्रादेशिक अधिकारी आशुतोष बारकुल यांनी सांगितले. याबाबत रिक्षा चालक मालक असोसिएशन कल्याण यांनी अधिकृत रिक्षा स्टँडची यादी जाहीर करण्याची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन विभागाकडून रिक्षा असोसिएशनच्या पदाधिकार्यांना पत्र देण्यात आले आहे.

रिक्षा चालक मालक असोसिएशन, कल्याण यांनी कल्याण येथे नवीन रिक्षा स्टँड आणि अधिकृत रिक्षा स्टँड जाहीर करण्याची परवानगी मिळण्याची मागणी केली होती. या मागणीला अनुसरुन उप प्रादेशिक कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक, केडीएमसी अधिकारी, वाहतुक शाखा कल्याणचे अधिकारी तसेच संघटनेचे पदाधिकारी यांच्या समवेत संयुक्तिक सर्वेक्षण करण्यात येवुन संबंधित स्टँडला मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांनी अटी शर्तीस अधिन राहुन मंजुरी देण्यात आली आहे. यादीत जाहीर केलेल्या ठिकाणीच मीटर, शेअर-ए-ऑटोरिक्षा स्टँड उभारण्यात यावा, ऑटोरिक्षा स्टँडमुळे वाहतुकीस कोणताही अडथळा होता कामा नये, कोणतीही रिक्षा डबल पार्किंग होणार नाही तसेच नमुद रिक्षा स्टँडमुळे वाहतुक कोंडी होणार नाही, प्रस्तावित रिक्षा स्टँड संदर्भात भविष्यात अडचण निर्माण झाल्यास त्याला इतरत्र हलविण्याचे अधिकार संबंधित विभागास असतील, रिक्षा चालविणारे चालकांनी नियमानुसार बॅच, ओळखपत्र प्रदर्शित करावे व गणवेश परिधान करावा, मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने ठरवुन दिलेले भाडेदर आकारणीनुसार भाडे घेण्यात यावे आदी अटी शर्ती परिवहन विभागाकडून देण्यात आले आहेत. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण अंतर्गत अधिकृत रिक्षा स्टँडची यादी जाहीर केली असून परिवहन अतर्गत एकूण ४४६ अधिकृत स्टँड असून यात कल्याण पश्चिममध्ये १२८, कल्याण पूर्वमध्ये ७२, बदलापूर मध्ये ११०, उल्हासनगर ७४, अंबरनाथ ६२ स्टँड असल्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली असल्याची माहिती रिक्षा चालक मालक असोसिएशनचे कार्याध्यक्ष संतोष नवले यांनी दिली.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना पूर्णवेळ बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया सुरळीत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना पूर्णवेळ बंदी घालण्यात आली असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी निर्गमित केले आहेत. रायगड जिल्ह्यात शनिवार, दि.07 फेब्रुवारीला मतदान तर सोमवार, दि.9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण न येता आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी, या उद्देशाने हे आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी यांनी बाजार व जत्रा अधिनियम, 1862 चे कलम 5 (ग) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करत शनिवार, दि.07 फेब्रुवारी 2026 रोजी पोलीस अधीक्षक रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघांमध्ये ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो, अशा सर्व ठिकाणी आठवडा बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामुळे मतदान केंद्रांच्या परिसरात गर्दी टाळणे, वाहतुकीचा अडथळा कमी करणे आणि मतदारांना मतदानासाठी मोकळे व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे शक्य होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# ठाणे महापालिका लोकशाही दिनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (04) :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, 02मार्च, 2026रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी मार्च महिन्याच्या लोकशाही दिनाच्या 15दिवस आधी म्हणजेच 16 फेब्रुवारी पर्यंत त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-1 (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-1 (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-1099/सीआर-23/98/18-अ, दिनांक 26 सप्टेंबर 2012 नुसार माहे डिसेंबर- 2012 पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या 15 दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर 1 महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात 6–7 व 9 फेब्रुवारीला मद्य विक्री बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी, संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी किशोर जावळे यांनी 6 फेब्रुवारी (मतदानाच्या आधीचा दिवस), 7 फेब्रुवारी (मतदानाचा दिवस) आणि 9 फेब्रुवारी 2026 रोजी (मतमोजणीचा दिवस) या तीन दिवशी रायगड जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या संबंधित जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रातील तसेच ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, त्या ठिकाणच्या कार्यक्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य व माडी विक्री अनुज्ञप्ती मद्य विक्रीस बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. 6 व 7 फेब्रुवारी रोजी संपूर्ण दिवस व 9 फेब्रुवारी रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होईपर्यंत सदर विक्री बंद ठेवण्यात येणार आहे.रायगड जिल्हा परिषद 59 व 118 पंचायत समिती गणांच्या निवडणूकीकरीता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान व 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी जिल्हाधिकारी किशोर जावळे यांनी मुंबई मद्य निषेध अधिनियम, 1949 चे कलम 142 (1) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त आदेशान्वये, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1915 जिल्ह्यात च्या कलम 135 (सी) मधील तरतुदीनुसार रायगड जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या निर्वाचन क्षेत्रातील तसेच ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे त्या ठिकाणच्या कार्यक्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य विक्री व माडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-1, एफएल-2, एफएल-३. एफएल- 4 ( क्लब अनुज्ञप्ती), एफएल/बीआर-2, सीएल-2, सीएल-3, सीएल / एफएल/टिओडी-3, टिडी-1 इ.) 6 फेब्रुवारी 2026 रोजी (मतदानाच्या आधीचा दिवस), 7 फेब्रुवारी 2026 रोजी (मतदानाचा दिवस) या दिवशी संपूर्ण दिवस व 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होईपर्यंत रायगड जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या संबंधित जिल्हा परिषद/पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य व माडी विक्री अनुज्ञप्ती मद्य विक्रीस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी श्री. किशोर जावळे यांनी दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावयाची असून त्यात कसूर झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा, 1949 कलम 54 व 56 मधील तरतुदीनुसार अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# कर्करोग रोखण्यासाठी जनजागृती व वेळेवर निदान गरजेचे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी जगभरात 'जागतिक कर्करोग दिन' (World Cancer Day) पाळला जातो. कर्करोगाबद्दल असलेले गैरसमज दूर करणे, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि या आजाराचा सामना करणाऱ्यांना पाठबळ देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. कर्करोग हा आजच्या काळातील एक गंभीर आजार असून वेळेवर निदान व योग्य उपचारांद्वारे त्यावर यशस्वी मात करता येऊ शकते. बदलती जीवनशैली, वाढते प्रदूषण आणि व्यसनाधीनता यामुळे कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. मात्र, प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास अनेक जीव वाचवता येतात. कर्करोग विभिन्न प्रकारचे असून त्याची लक्षणे विविध स्वरुपाची असू शकतात. कर्करोगाची मुख्य लक्षणे म्हणजे शरीरावर आलेली गाठ, आवाजात बदल, अचानक वजन कमी होणे आणि दीर्घकाळ राहणारा खोकला इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तंबाखू, सिगारेट आणि मद्यपानापासून दूर राहणे. आहारात फळे आणि पालेभाज्यांचा समावेश करणे तसेच नियमित व्यायाम करणे. कर्करोगाविषयी जनजागृती करणे आणि संशयित रुग्ण तपासणी करणे करिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने टाटा मेमोरिअल रुग्णालया सोबत करार केला असून त्याअंतर्गत महापालिकेच्या आरोग्य केंद्रातील आशा स्वयंसेविकांनी ४ लाखांहून अधिक महिलांचे सर्वेक्षण केले असून संशयित लक्षणे असलेल्या ६००० महिला आढळून आल्या आहेत. टाटा मेमोरिअल रुग्णालयाच्या टीम द्वारे या महिलांची तपासणी होणार असून आवश्यकते नुसार पॅप स्मियर, बायोप्सी घेण्यात येणार आहे. “कर्करोगाविरुद्धचा लढा हा सामूहिक प्रयत्नांतूनच यशस्वी होऊ शकतो. ‘मिशन शक्ती’सारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येत असून सर्व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा,तसेच नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी, तंबाखू व व्यसनांपासून दूर राहावे, संतुलित आहार व व्यायामाचा अवलंब करावा”, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी केले आहे.

# ठाणे जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्टया जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासकीय कार्यालयांसाठी शासनाने सन 2026 करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरिक्त तीन सार्वजनिक सुट्टया कोंकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी परिपत्रकाव्दारे जाहीर केल्या आहेत.

ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता शासनाने सन 2026 करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरिक्त दि. 27 ऑगस्ट 2026 गुरुवार नारळी पौर्णिमा, दि. 25 सप्टेंबर 2026 शुक्रवार अनंत चतुर्दशी, दि. 06 नोव्हेंबर 2026 शुक्रवार धनत्रयोदशी या तीन स्थानिक सुट्टया जाहीर करण्यात आल्या आहेत. शासन ठराव राजनैतिक व सेवा विभागाकडील दि. 16 जानेवारी 1958 च्या निर्णयातील परिच्छेद क्र. 5 अन्वये विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हे करण्यात आले आहे. या दिवशी ठाणे जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहतील. असे कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जेष्ठ नागरिक लक्ष्मण शेलार यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील )** वासिंद येथील जेष्ठ नागरिक लक्ष्मण दगडू शेलार (वय -85) यांचे रविवारी वृद्धपकालाने निधन झाले.



लक्ष्मण शेलार हे नेहमी विविध धार्मिक व सामाजिक कार्यात सहभाग असत. शांत, मनमिळाऊ स्वभावाचे असलेले लक्ष्मण शेलार यांनी सर्वांशी सलोख्याचे संबंध जपले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी व नातवंडे, नातसून असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेवेळी विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच वारकरी संप्रदाय मंडळी, ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024